स्थापना
१ मे १९५७

F:\2026-2027\Main Market\प्रसिध्दीपत्रक 2025-2026.docx5

# कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

श्री छत्रपती शिवाजी महाराज मार्केट यार्ड, गुलटेकडी, पुणे - ४११०३७
www.apmcpune.in / Email: admin@apmcpune.in, kubspune37@rediffmail.com

जा.क्र.प्रशा/स्थापत्य/उत्तमनगर उप.बा./प्र.जागा.काँ./प्रसिध्दीपत्रक/१३९८ /२०२६-२७ दि. २१ /०८/२०२६

## प्रसिध्दीपत्रक

**विषय :- कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेच्या उत्तमनगर उपबाजार आवार येथील प्रवेशद्वारा जवळील जागेमध्ये काँक्रीटीकरणाचे काम करणेबाबत...**

सक्षम ठेकेदारांना कळविणेत येते की, **कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेच्या उत्तमनगर उपबाजार आवार येथील प्रवेशद्वाराजवळील जागेमध्ये काँक्रीटीकरण** करावयाचे आहे. सदर काम हे शासनाने आदेशित केलेल्या सर्व अटींचे काटेकोरपणे पालन करूनच करावयाचे आहे. काम करतेवेळी कोणत्याही कामगारांची वित्त / जिवितहानी / अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ठेकेदाराची राहील. काम करावयाच्या ठिकाणी आपण स्वत: (ठेकेदार) यांनी संस्थेच्या स्थापत्य विभागाच्या संबंधित अधिकारी / कामाचे वास्तुशास्त्रज्ञ / कर्मचाऱ्यासोबत जाऊन, प्रत्यक्षरित्या कामाची पाहणी करुन तद्नंतरच आपल्या मोहरबंद दरपत्रके सादर करावीत. काम करतेवेळी कोणत्याही अटींचा भंग झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत ठेकेदाराची राहील.

तरी सदर कामाची दरपत्रके स्थापत्य विभागात उपलब्ध आहेत. सदर कामाची दरपत्रके दिनांक २१ /०८/२०२६ ते दिनांक- २१ /०८/२०२६ पावेतो मुख्य कार्यालयात मिळतील. सदर कामाची मोहरबंद दरपत्रके दिनांक २२ /०८/२०२६ अखेर या कार्यालयात सादर करावीत. सादर झालेली मोहरबंद दरपत्रके शक्य झाल्यास त्याच दिवशी अथवा दिनांक २४ /०८/२०२६ रोजी उपस्थित ठेकेदारांसमोर उघडण्यात येतील, कोणतेही अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा हक्क कृषी उत्पन्न बाजार समिती पुणेने राखुन ठेवला आहे, याची नोंद घ्यावी.

सदरचे (www.apmcpune.in ) प्रसिद्धीपत्रक मुख्य कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर व बाजार समितीच्या संकेतस्थळावर दर्शविणेत येत आहे.

सचिव
कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे

फोन : +९१ २० २४२६०२०३ / २४२६२३४९ / २४२७२८८७

Scanned with OKEN Scanner